विशेष विभाग

प्रणयाचे नाना रंग


# नर-मादी ते पुरुष-स्त्री आणि मधले अनेक

चन्द्रशेखर पुरन्दरे

**प्रस्तावना व लेखाची मांडणी**

प्रथम लेखामागची दोन तीन गृहीते नमूद करतो. पहिले म्हणजे, कोणत्याही समाजाची प्रगती होत आहे का हे पहाण्याची एकमेव कसोटी म्हणजे 'तळागाळातल्या - 'शेवटच्या' - माणसाची परिस्थिती सुधारत आहे का' या प्रश्नाचे उत्तर 'हो' असावे. दुसरे याला जोडून गृहीत असे की समाजातील दुबळ्या गटांची परिस्थिती सुधारण्याची जबाबदारी केवळ सरकारवर, कायद्यांवर नाही. सरकारी धोरण, कायदे त्यांना अनुकूल असलेच पाहिजेत पण हे गट दुबळे झाले किंवा होत आहेत याला बृहत् समाज जबाबदार असतो. तेव्हा त्याने ती जबाबदारी उचलली पाहिजे. 'परिस्थिती' म्हणजे शारीरिक, आर्थिक, सांस्कृतिक, व अन्य सामाजिक घटक. तिसरे गृहीत म्हणजे असे दुबळे गट कितीही अल्पसंख्यांक, एकूण लोकसंख्येच्या अगदी अपूर्णांक टक्क्यात असले तरी त्यांना बहुसंख्यांकांचे हक्क, अधिकार, प्रतिष्ठा असल्या पाहिजेत आणि ही बृहत् समाजाची विशेष जबाबदारी आहे.

या गृहीतांवर संदिग्ध लैंगिक लोकांचा विचार लेखात केला आहे.



*People out there*

शिखंडीपासून आजवर सर्व काळात समाजात असे लोक आढळतात. त्यांच्या शारीरिक-मानसिक घडणीवर आधुनिक विज्ञान आता जरा प्रकाश टाकत आहे. त्यानुसार नर मादी या 'नैसर्गिक' किंवा 'देवदत्त', निश्चित ओळखी नाहीत. ती लैंगिकतेची दोन टोके आहेत आणि 'हे' किंवा 'ते' असा पर्याय नसून तो एक spectrum आहे. तसेच जन्मत: सगळे सारखे नसतात आणि नवजात अर्भक निरागस नसते. प्रत्येकजण त्याच्या किंवा तिच्या जनुकांचा वारसा घेऊन जगात येतो.

लेखात प्रथम संदिग्ध लैंगिकतेचे वर्णन व समकालीन उदाहरणे आहेत. मग विज्ञान आणि निसर्ग यांचे याबाबत म्हणणे पाहिले आहे. नंतर सामाजिक संस्था, त्यांच्या समजुती व त्या पूर्वग्रहांविरुद्धचे निषेध नोंदवले आहेत. या प्रश्नाला जोडून जपानमधील एक नवीन प्रवाह आणि नि:संतान यांचा उल्लेख केला आहे.

**संदिग्ध लैंगिक म्हणजे कोण?**

सामान्य व बहुसंख्यांना लागू पडणारी समजूत म्हणजे जन्मणारे मूल नर म्हणून जन्माला येते किंवा मादी म्हणून. त्यानंतर पुरुष किंवा स्त्री होण्याचा प्रवास सुरू होतो. तो प्रवास व्यक्ती-अंतर्गत मेंदूतून येणारे संकेत, शारीरिक रसायने वगैरेंनी जसा निर्धारित केलेला असतो, तसाच बृहत् समाजही निर्धारित करतो. म्हणजे पुरुषाने कसे वागावे, स्त्रीचे समाजातील स्थान इत्यादी गोष्टी केवळ निसर्गदत्त नसतात. त्या घडवल्या जातात. मग तो पुरुष किंवा ती स्त्री होते. इथे याचा इतपतच उल्लेख करू व नर/ पुरुष व मादी/ स्त्री यामध्ये आढळणाऱ्या संदिग्ध लैंगिकतेकडे वळू.

ही लैंगिकता विविध प्रकारची असते. अशा लोकांना केवळ 'संदिग्ध लैंगिकता' असे सरसकट लेबल लावता येत नाही. लेखात 'संदिग्ध' हा शब्द नकारार्थाने वापरलेला नाही. आजवरच्या आपल्या रूढ संकल्पना आपण नि:संदिग्ध धरून चालतो, त्या विस्तारणे आवश्यक आहे. भाषेच्या या मर्यादेमुळे 'संदिग्ध' ही संज्ञा. तिच्या आकलनासाठी आपल्या पूर्वग्रहांची सतत तपासणी आवश्यक असते. उदा. मी इथल्या (इंग्लंडमधल्या) एका मित्राबरोबर या विषयावर चर्चा करायला पाहिली. त्याने अशा लोकांबद्दल अतिशय तिरस्कार दाखवला आणि 'असल्या विकृतांबद्दल बोलायलासुद्धा नको' असे म्हटले!. आपल्याकडे (भारतात) तर आकस, पूर्वग्रह आणखीच मुरलेले आहेत. मुलगी होणार असे गर्भनिदान झाले की गर्भपातही होतात. इथे निदान सार्वजनिकरीत्या असे मत व्यक्त तरी करता येत नाही - खटला भरला जाऊ शकतो, सामाजिक छि:थू होते. पण एकूण वातावरण काहीही असले, तरी या नवीन वास्तवाची दखल घेतली पाहिजे. ते आजवर सुप्त होतेच, आता उघड होत आहे. त्याचे रूप, त्याचा अन्वय, त्याबाबत धोरणे, श्रेय सामाजिक मानसिकता काय असावी, काय असू शकते - सगळेच आज अस्पष्ट आहे,

दुसरे एक वैयक्तिक निरीक्षण सांगतो. अनेक वेब-साइटसवर मी माझी चित्रे लावतो. दहा वर्षांपूर्वीपर्यंत, अशा एखाद्या साईटवर नोंदणी करताना फॉर्मवर male किंवा female एवढाच पर्याय असे. आता other किंवा unknown असेही पर्याय असतात. आणि असे वर्णन अनेक मंडळींच्या profile वर आज आढळतेही. एकदोघांनी तर 'मला पुरुष म्हणायचे का स्त्री हे तुम्हीच ठरवा - मला त्याची काही पर्वा नाही' असेही आवर्जून नमूद केले आहे.

माझ्या ओळखीचा इथला एक बालमानसोपचार तज्ज्ञ आहे. तो ५-६ वर्षांपूर्वीपर्यंत संदिग्ध लैंगिकतेची एखादी केस वर्षभरात बघत असे. आता अशा केसेस महिन्याला एक.

सध्या फेसबुकवर या संदर्भात स्वत:चे वर्णन करण्यासाठी एक, दोन, तीन नाही तर तब्बल छप्पन्न (काही देशांत एकाहत्तर!) पर्याय उपलब्ध आहेत! म्हणजे, स्त्री-पुरुष हे भेद तर कालबाह्य होतच आहेत पण तृतीय-पंथीय या संज्ञेलाही रूढ अर्थ राहिलेला नाही. उदाहरणार्थ फेसबुकवरील पाच पर्याय असे :

१. agender किंवा neutrois - हे लोक स्वत:ला कोणत्याच रूढ लिंगाचे मानत नाहीत. हा फक्त फॉर्म भरण्यापुरता मर्यादित 'मजेचा' प्रकार नसतो. अनेक जण hormone therapy ने, प्रसंगी ऑपरेशनने शरीरात हा बदल करूनही घेतात.

२. androgyne किंवा androgynous - हे लोक स्वत:त स्त्री व पुरुष दोघांचेही गुणधर्म असल्याचे मानतात.

३. bigender - स्त्री-पुरुष असे दोन्ही गुणधर्म वरील androgyne मध्ये असतात तर bigender कधी स्वत:ला पुरुष मानतात तरी कधी स्त्री.

४. female to male - शारीरिकदृष्ट्या किंवा लिंग-ओळखीने या व्यक्ती स्त्री असण्यापासून पुरुष होण्याकडे संक्रमण करत असतात.

५. gender-questioning - हे लोक आपण नक्की पुरुष आहोत का स्त्री याच्या शोधात असतात.

अशा अनेक छटा.

यांच्या संख्येचा अंदाज येण्यासाठी - उघड-उघड सम-लिंगी स्त्री, सम-लिंगी पुरुष व स्त्री आणि पुरुष दोघांशीही लैंगिक संबंध ठेवणाऱ्या व्यक्ती आज अमेरिकेत सुमारे ७० लाख असाव्यात. याखेरीज ज्यांची लैंगिकता त्यांच्या शारीरिक लिंगाशी जुळत नाही असे transgender - लेखासाठी 'संदिग्ध लैंगिक'. ते सुमारे ७ लाख असावेत. (अमेरिकेची लोकसंख्या सुमारे ३२ कोटी. तुलनेसाठी चीन आणि भारताची प्रत्येकी याच्या चौपट!) Transgender लोक भौगोलिकदृष्ट्या विखुरलेले असतात. जवळपास रहाणारी

अशी व्यक्ती माहिती होणे प्राय: अशक्यच. अशा परिस्थितीत फेसबुकसारखे सोशल नेटवर्क यांना वरदान ठरते. यांच्यात आत्महत्येचा प्रयत्न करू पहाणारे बृहत् समाजापेक्षा जास्त प्रमाणात असतात. त्यांचे नेटवर्कवरचे एखादे विधान आगामी संकटाची इतरांना चाहूल देते. असे संभाव्य आत्महत्येचे प्रयत्न इतरांच्या वेळीच हस्तक्षेपाने टळले आहेत. त्याबरोबरच असे लोक आपल्या आजूबाजूला आहेत, ते 'नॉर्मल' आहेत ही सहसंवेदना बृहत् समाजात जागृत होणे हाही या नेटवर्कचा फायदा असतो.

**संदिग्ध लैंगिक लोकांची उदाहरणे**

एक अभ्यास या संदर्भात विशेष उल्लेख करण्यासारखा आहे. तो या लैंगिकतेचे सामाजिक, मानसिक गांभीर्य दाखवतो.

आठ महिन्यांच्या एका मुलाचे शिश्न सर्जनने ऑपरेशनमध्ये घोळ करून घालवले. आई-वडिलांनी 'आता काय करावे' यासाठी दुसऱ्या विख्यात डॉक्टरचा सल्ला घेतला. 'निसर्गाची दिशा नरमादीतील संतुलन राखणे ही असते' असा या डॉक्टरचा विश्वास. (प्रचलित आदर्शवादाचा वैद्यकीय व्यवसायावरील प्रभाव लक्षात यावा. तो पुढेही दिसेल.) त्याने या बाळाची वृषणे काढून कृत्रिम योनी बसवण्याचा सल्ला दिला. पालकांनी ते करून, मुलाला मुलगी म्हणून वाढवले. मुलाला हा इतिहास सांगितला नाही. 'व्यक्ती स्त्री होणार का पुरुष होणार - हे मुलाला कसे वाढवले जाते, यावर ठरते' या तत्कालीन सिद्धांताचा पुरावा म्हणून हे उदाहरण वैद्यकीय अभ्यासक्रमात दिले जात असे. परंतु पुढे १९९७ साली या 'मुली'ची आपण मुलगा आहोत ही भावना बालपणापासून दाबली गेल्याचे स्पष्ट होऊ लागले. ती बाहुल्यांपेक्षा बंदुकांशी खेळत असे, फ्रॉक फाडत असे, अगदी लघवीही उभ्याने करण्याचा प्रयत्न करत असे. तिच्या तारुण्यात तर एक वेळ अशी आली की पुरुष म्हणून तरी जगायचे, नाही तर आत्महत्या करायची एवढाच पर्याय तिच्यासमोर राहिला. यावरून निसर्ग व संगोपन यातील द्वंद्व किती हिंसक होऊ शकते याचा अंदाज यावा. शेवटी तिच्या वडिलांनी तिला वस्तुस्थिती सांगितली. मग परत अनेक ऑपरेशन्स करून घेऊन ती पुरुष झाली आणि एका स्त्रीशी लग्नही केले.

दुसरे गाजलेले अलीकडचे उदाहरण Chelsea Manning या अमेरिकन लष्करातील माजी कर्मचाऱ्याचे. १९८७ साली मुलगा म्हणून जन्मलेला Bradley Manning स्वत:ला मुलगी मानत असे. घरच्यांनी या कलाकडे दुर्लक्ष केले. शाळेतील मुले त्याला चिडवत असत, ही शारीरिक, मानसिक अस्वस्थता , सामाजिक अवहेलना त्याने बरीच वर्षे सहन केली.

नंतर तो लष्करात भरती झाल्यावर इराकमध्ये अमेरिकन लष्कराच्या software खात्यात होता. तेथे अफगाण व इराक युद्धातील विनाश, हेतुशून्यता लक्षात येऊन त्याने लष्करी अधिकाऱ्यांचे गोपनीय संदेश (काही लाख) wikileaks या इंटरनेट तस्करी संघटनेला गुप्तपणे पाठवले. जगभर नामांकित वृत्तपत्रात ते प्रसिद्ध झाले. अमेरिकेचे युद्धातील मनमानी व्यवहार - विशेषत: निष्पाप नागरिकांना ठार मारणे, सांगायची धोरणे व प्रत्यक्षातील धोरणे यातील भयकारक तफावत इत्यादी गौप्यस्फोट झाले. सरकारची नाचक्की झाली. या प्रकरणात त्याच्यावर खटला झाला. ३५ वर्षांचा तुरुंगवास झाला. तुरुंगात त्याने लिंग-बदलाच्या उपचारांची मागणी केली. ती मान्य व्हायला काही काळ गेला. दरम्यान एकाकी तुरुंगवासातील नैराश्याने ग्रासून त्याने दोनदा आत्महत्येचा प्रयत्नही केला. अखेर हे उपचार सुरु झाले. त्या औषधांमुळे त्याची त्वचा मऊ होऊ लागली, त्वचेवरील केस कमी होऊ लागले. पण तीव्र मानसिक आंदोलनेही होऊ लागली. एका क्षणी शरीरातील नवे बदल सुखावह वाटत तर पुढच्या क्षणी एकाकीपणा, हरवल्याची भावना वगैरे नकारात्मक भावना सतावत. त्या काळात इंटरनेटवरील समदु:खी व्यक्तींशी तो संपर्कात असे. या शारीरिक मानसिक दिव्यातून तो पुरुषाचा Chelsea नावाचा स्त्री झाला.

ओबामाने अध्यक्षपद सोडण्याआधी विशेष अधिकारात तिला क्षमा केली. सात वर्षे शिक्षा भोगून ती या वर्षी मुक्त झाली. ट्रम्पच्या मते ती देशद्रोही आहे.

तिने बाहेर काढलेल्या माहितीमुळे wikileaks सर्वतोमुखी झाले, पुढे एडवर्ड स्नोडेनने असेच सी आय एला अडचणीत आणले.

मुद्दा हा की संदिग्ध लैंगिकता अशा लोकांना निम्न करत नाही. अमेरिकेसारख्या महाशक्तीशी तेथे राहून झुंज, स्वत:च्या लैंगिकतेला त्याच वेळी वाचा फोडणे आणि एकाकी तुरुंगवास यातील एक गोष्टही सामान्य माणसाला खच्ची करू शकेल. पण वैयक्तिक यातना सोसत समष्टीचे कल्याण करण्याचे, आपल्या सद्सद्विवेकबुद्धीनुसार वागण्याचे धैर्य दाखवणे असामान्य. सत्तेला सत्य सांगणे हे प्रत्येक कलाकाराचे कर्तव्य आहे असे Graham Greene च्या कादंबरीतील एक व्यक्ती म्हणते, त्याचे हे उदाहरण.

**विज्ञान**

आता संदिग्ध लैंगिकतेबाबतचे अलिकडचे वैज्ञानिक संशोधन पाहू. पहिला शास्त्रीय अभ्यास जन्मत: अनिश्चित शिश्न असणाऱ्या २५ जणांचा करण्यात आला. ही एक निराळी शारीरिक अवस्था असते. (शारीरिक अनियमितता न म्हणता 'निराळी अवस्था' म्हटले आहे. कारण अनियमितता ही संज्ञा नर व मादी हा भेद 'नियमित', 'निश्चित' आहे असे गृहीत धरते, पण ही अवस्था मूल्य-निरपेक्षतेने पहायला हवी.) या सगळ्यांची वृषणे ऑपरेशन करून काढण्यात आली होती. तरीही ते सर्वजण दंगा-मस्ती करण्यासारखे मुलग्यांचे विशेष गुणधर्म दाखवत; त्यांचे खेळ, इतर वृत्ती, आवडी-निवडीही

मुलग्यांसारख्याच होत्या. त्यातील निम्मे तर आपण मुलगा आहोत असे ठासून सांगत. त्यातील एक फक्त पाच वर्षांचा होता.

समलिंगी पुरुषांवरील संशोधनात असे आढळून आले आहे की puberty च्या आधीच्या हार्मोन्सच्या बदलाने त्यांना इतर पुरुषांविषयी आकर्षण वाटायला सुरुवात होते. काही मुलगेच असे का होतात, ते विज्ञानाला माहीत नाही. जनुके असतील, हार्मोन्स असतील, इतर शारीरिक कारणे असतील.

(विस्तारभयास्तव सुलभीकरण करून) गर्भ नर होणार का मादी, मग नराची किंवा मादीची स्वभाव-वैशिष्ट्येही जनुके/हार्मोन्स ठरवतात. मेंदूच्या वाढीच्या अगदी सुरुवातीपासून ही प्रक्रिया चालू होते (अभिमन्यू), नंतर प्रौढावस्थेत त्यामानाने कमी बदल घडतात. म्हणजे आधी नर मग नर ते पुरुष किंवा आधी मादी मग मादी ते स्त्री हे संक्रमण अगदी आधीपासून सुरू होते. या संशोधनाचे महत्त्व असे की आतापर्यंतची तीन गृहीते आज तरी खोटी ठरली आहेत.

एक : नवजात अर्भक 'निरागस' असते, त्या कोऱ्या पाटीवर संस्कार, समाज वगैरे लिखाण करतात. दोन : मुलींसारखे वाढवलेले मुलगे मुली म्हणूनच वागतील (आणि त्याचा व्यत्यास). तीन : आई-वडील मुलांना कसे वाढवतात यावर मुलगे - मुली यांच्यातील फरक अवलंबून असतो. फक्त जननेंद्रीय फरक सोडता, मुलगे व मुली सारखीच असतात हा समज वैज्ञानिकदृष्ट्या निराधार दिसतो.

मुलग्यांमध्ये आईकडून एक X क्रोमोझोम येतो, वडिलांकडून एक Y क्रोमोझोम. मुलींकडे आई व वडिलांकडून प्रत्येकी एकेक X क्रोमोझोम येतो. पण टर्नर सिंड्रोम असणाऱ्या मुलांमध्ये आईकडून किंवा वडिलांकडून आलेला एकच X क्रोमोझोम असतो. इतर काहीच रचना स्वयंसिद्ध नसेल तर मानवी शरीराची रचना आपोआप मादीची असते. त्यामुळे या मुलीच असतात पण त्यांची उंची कमी असते, पुनरुत्पादनक्षमता नसते. त्या खोलात जाण्याचे कारण नाही पण गर्भधारणेच्या वेळी घडलेल्या अपघाताने समाज तिची या कारणांनी अवहेलना करण्याची शक्यता असते.

**निसर्ग**

संदिग्ध लैंगिकता व तिच्या छटा आज जगभर मान्य होत नाहीत. माझ्या मते याचे प्रमुख कारण म्हणजे संदिग्ध लैंगिकता रूढ पुनरुत्पादन नाकारते. पुनरुत्पादनाला महत्त्व देण्यात प्रस्थापित धर्म जेवढा जबाबदार आहे, तेवढीच चार्ल्स डार्विनच्या उत्क्रांतिवादाची रूढ समजूत जबाबदार आहे.

उत्क्रांतीवादाची रूढ समजूत तर, प्रसंगी धर्म करतो (हिंदू योगी, बौद्ध भिक्षु, खिश्चन धर्मगुरू,वगैरे) तो अपवादही करत नाही. डार्विनने ख्रिश्चनच नव्हे, सगळ्याच धर्मांच्या मानवी जीवनाच्या उत्पत्तीविषयक श्रद्धांना आव्हान दिले. माणूस हा देवाची निर्मिती आहे, त्याच्या दयेने आपण पृथ्वीतलावर आलो आहोत, तो आपल्या पापांना क्षमा करतो, वगैरे श्रद्धा. वैज्ञानिक उत्क्रांतीतत्त्वानुसार आपण या अवस्थेपर्यंत आज पोचलो त्याचे कारण म्हणजे आपल्या जमीन आणि पाण्यावरच्या पूर्वजांच्या भक्षक, आक्रमक हल्ल्यांपासून आपण सुटका करून घेतली आणि आपल्या मानवी वंशाचे पुनरुत्पादन करू शकलो. या संक्रमणात प्रचंड हिंसा झाली. ती उत्क्रांतीची काही लक्ष वर्षे. थोडक्यात माणूस म्हणजे स्वार्थी जनुकांनी निर्माण केलेले व उदात्तपणा लादलेले यंत्र किंवा robot आहे.

या संदर्भात निसर्गाचे वैज्ञानिक रूप पाहू. जैविक उत्पत्तीशास्त्रानुसार नैसर्गिक जीवन हे पराकोटीचे अनैतिक असते. त्यात दूरदृष्टी नसते, करुणा नसते, 'नैसर्गिक निवड' ही जास्तीत जास्त स्वार्थ लवकरात लवकर कसा साधला जाईल हे पहाण्याची प्रक्रिया असते. प्राणीमात्र इतर प्राण्यांकडून त्यांच्यावर होणाऱ्या हिंसेचे तर बळी असतातच पण ते स्वजातीयांनाही दयामाया दाखवत नाहीत. अर्भकांना, भावंडाना ठार मारणे, बलात्कार हे प्रकार अनेक प्राण्यांच्या समूह-जीवनात आढळतात. युगुलव्यवस्था (एक मादी आणि तिचा एकच नर) असणाऱ्या प्राण्यांमध्येही व्यभिचार असतो. आपल्याच जातीच्या प्राण्यांना खाणेही आढळते (मानवी जगात नरमांसभक्षक). 'जीवो जीवस्य जीवनम्' या न्यायाने हिंसेने मृत्यू हा प्राणीजगताचा अविभाज्य भाग आहे. नैतिकतेच्या संदर्भात प्राणी-जगताचा उदो उदो अनेक बाबतीत केला जातो. सामूहिक संघर्ष नसलेले जीवन, हेवेदावे नसणे वगैरे मूल्ये निसर्गाकडून शिकावीत असा याचा रोख असतो. इथे विज्ञान दाखवते तो निसर्ग


*captivity*

आणि काल्पनिक रमणीय निसर्ग यांत गल्लत होते.

विशेष म्हणजे, मानवी समाज अस्तित्वात आल्यावरही वर म्हटलेली हिंसा कमी झाल्याचे दिसत नाही. हे आताच्या पुरातत्त्वशास्त्राने सिद्ध केले आहे. (पन्नास वर्षांपूर्वीच्या उत्खनननातून त्यावेळच्या तज्ज्ञांचे निरीक्षण अगदी उलटे होते - पूर्वी सगळे गुण्या-गोविंदाने नांदत असत, इत्यादी romanticism). अगदी 'शांतताप्रिय' समाजातही पूर्वापारपासून मोठ्या प्रमाणावर हत्याकांडे चालू राहिलेली आहेत. दोन्ही महायुद्धातील व इतर युद्धातील अमेरिका व युरपमधील पुरुषांच्या हत्या एकूण लोकसंख्येच्या ५ टक्के असाव्यात. या तुलनेत द. अमेरिका खंडातील पाच आदिम जमातीतील बळी १० ते ६० टक्के होते. तेही अत्यंत निर्घृण हिंसेने. प्रागैतिहासिक व 'असंस्कृत' (आधुनिक सभ्यतेने दूषित न केलेल्या याअर्थी असंस्कृत) समाज शांतताप्रिय होते ही दंतकथा आहे. दिवेल नावाच्या पुरातत्त्वशास्त्रज्ञाने ३७ संस्कृतीतील ९९ जमातींचा अभ्यास केला. त्यातील ६८ जमाती अभ्यासाच्या वेळी एकमेकांशी लढाई करत होत्या , २० जमाती गेल्या ५ ते २० वर्षांत लढाईत होत्या, तर उरलेल्यांनी २० वर्षांपूर्वी लढाईत असल्याचे सांगितले.

थोडक्यात, रूढ धर्म आणि उत्क्रांतिवाद दोन्ही पुनरुत्पादनाला महत्त्व देतात. निसर्गाच्या खऱ्या (romantic नव्हे) स्वरूपात हिंसा व पुनरुत्पादनासाठी हिंसा (प्रतिस्पर्ध्याला मारणे) हे चित्र दिसते.

'नैसर्गिक' ते श्रेयस्कर व जे काही अश्रेयस्कर ते मानवी सभ्यतेने निर्माण केले (Rousseau). या उलट माणूस घडतो तो फक्त संस्कृतीने. यातील कोणतेच गृहीत सरसकट ग्राह्य दिसत नाही. उदा. माणूस कोणती भाषा बोलतो हे सर्वत: तो कोठे वाढतो (आफ्रिकेत का सिंगापूरमध्ये) यावर म्हणजे समाजावर अवलंबून असते. त्याचा नैसर्गिक घटकांशी काहीच संबंध नसतो. तर काही विकार (cystic fibrosis, Huntington's disease) केवळ आनुवांशिक असतात. त्यांचा संस्कृतीशी काहीच संबंध नसतो.

**सामाजिक संस्था**

संस्थांची अशा व्यक्तींशी किंवा वृत्तींशी होणारी देवघेव पाहू. त्यांच्याकडे ज्या दृष्टीने पाहिले जाते त्यावरून त्या समाजाच्या (म्हणजे त्यातील प्रभुत्ववादी मुख्य प्रवाहाच्या) मूल्य-व्यवस्था, पूर्वग्रह, सहिष्णुता, विज्ञाननिष्ठा, अंधश्रद्धा - अशा एकूण आदर्शवादावर प्रकाश पडतो. जाणता किंवा अजाणता दृष्टिकोन कसे घडतात, ते कळते. समानतेचा घोष व पर्यायाने सामाजिक विकास या कसोट्यांवर तपासायला हवा.

प्रथम धर्म पाहू. स्त्री व पुरुष हा भेद सगळ्याच धर्मांमध्ये (व म्हणून संस्कृतींमध्ये) मूलभूत मानला गेलेला आहे. धर्माची इतर अंगे म्हणजे प्रथा, श्रद्धा याही हा भेद मूलभूत मानतात. तेवढ्यावर न थांबता इतर छटा (मधले अनेक) 'अनैतिक', 'समाज-धारणेला धोकादायक' म्हणून गर्ह्य मानल्या जातात. समाज किती 'धार्मिक' त्यावर तो देश तसा कायदाही करतो. या भेदाचे उल्लंघन करणाऱ्यांना शिक्षाही दिली जाते. उदाहरणार्थ कर्मठ इस्लामी राजवटी समलिंगी संबंध मान्य करत नाहीत. इराणमध्ये अशा 'गुन्हेगारांना' सार्वजनिक फाशी दिली जाते. आणि ती विकृत उत्सुकतेने बघायला गर्दीही जमते. कर्मठ ख्रिश्चन धर्मालाही हा कल मंजूर नाही. त्याचे प्रतिध्वनी मिडियामध्ये उमटतात. त्यायोगे प्रेक्षकांचे ग्रह निर्माण तरी होतात किंवा तसे पूर्वग्रह बळकट तरी होतात. उदा. अमेरिकेच्या एका टी व्ही चॅनेलवरील एका लोकप्रिय कार्यक्रमात निवेदिकेने समलिंगी व्यक्ती 'अनैसर्गिक' असतात व त्यांनी वैद्यकीय उपचार करून आपला कल बदलावा (म्हणजे भिन्न-लिंगी संबधांकडे वळावे) असे प्रतिपादन केले. म्हणजे, धर्मापासून सुरुवात होऊन कायदा, मीडिया हेही या विषयाशी संलग्न होतात. सामजिक बहिष्कृती, वैयक्तिक शरम, तशा संबंधांची नैसर्गिक वृत्ती त्या व्यक्तीला दाबून ठेवायला लागणे व त्यातून होणारे मानसिक विकार , इत्यादी परिणामांची कल्पना करता यावी. मुख्य प्रवाहात आपण बसत नाही हे लक्षात आल्यावर अशा व्यक्ती स्वत:ला दोष देतात, प्रसंगी वरील उदाहरणांप्रमाणे आत्महत्येकडेही वळतात. हा सामाजिक पूर्वग्रहांचा हिंसक परिणाम.


ताजे उदाहरण द्यायचे झाले तर ट्रम्प महाशयांनी transgender व्यक्तींना अमेरिकन लष्करात प्रवेश यापुढे मिळणार नाही असे जाहीर केले. त्यामुळे लष्कराचा त्यांच्यावर होणारा जास्तीचा खर्च वाचेल, हे प्रतिपादन. अमेरिकेसारख्या राष्ट्राचा प्रमुख अशा उपेक्षितांबद्दल किती अज्ञ, पूर्वग्रहग्रस्त आणि परिणामत: अन्यायी असू शकतो, याचे हे उदाहरण आहे. लष्कराचा 'खर्च' काय ते पाहू. खात्रीच्या अंदाजानुसार अमेरिकन लष्करात दीड ते साडेसहा हजार अशा व्यक्ती असाव्यात. यातील जास्तीत जास्त २७० जण लिंग बदलासाठी hormone treatment किंवा ऑपरेशन करून घेतील. त्याचा लष्करावर पडणारा खर्च जास्तीत जास्त ८४ लाख डॉलर्स असेल. लष्कराचे एकूण अंदाज-पत्रक ६०० कोटी डॉलर्सचे. फक्त गाण्या-बजावण्याच्या कार्यक्रमांवर (ऑर्केस्ट्रा वगैरे) लष्कराने २०१५ साली ५ कोटी डॉलर्स खर्च केले. यावरून या लोकांच्या मानसिक, शारीरिक यातना जरा कमी करण्यासाठी मुख्य प्रवाह किती उदासीन असतो हे कळावे.

अमेरिकेत सार्वजनिक ठिकाणी संदिग्ध लैंगिकता असणाऱ्या व्यक्तींनी 'पुरुषांसाठी' बाथरूम वापरायची का 'स्त्रियांसाठी' हा वाद वर्षभर चालू आहे. त्या व्यक्तीला आपण जे आहोत असे वाटते, ती बाथरूम त्या व्यक्तीला वापरायची मुभा असावी असा ओबामा राजवटीचा आदेश बऱ्याच राज्यांनी फेटाळला, कोर्टात प्रकरण गेले.

आता ट्रम्पने तो आदेश नामंजूर केला आहे. परिणामत: मोर्गाना स्नो नावाच्या स्वत:ला स्त्री मानणाऱ्या व्यक्तीला एका नाईटक्लबमधील स्त्रियांच्या बाथरूममध्ये शिवीगाळ करण्यात आली, हुसकावून लावण्यात आले. हे तर एक उदाहरण. विशेषत: शाळांमध्ये अशी मुले इतर 'नॉर्मल' मुलंना धोका असू शकतो, असा प्रतिवाद होतो.

ट्रम्पच्या धोरणाचे बळी पडायला सुरुवात झालीच आहे. रायली डॉश नावाच्या लष्करी शिक्षणात आताच पदवी घेतलेल्या संदिग्ध लैंगिक व्यक्तीने लष्करात वैमानिक होण्याच्या स्वप्नावर पाणी सोडून एखाद्या शाळेत गणिताची शिक्षिका होण्याचा निर्णय घेतला आहे.

याला जोडून अमेरिकेतील धार्मिक श्रद्धांची आकडेवारी पाहण्यासारखी आहे. त्यावरून अशा ग्रहांचा थोडाफार खुलासा होऊ शकेल.




ख्रिश्चनांमधील ७६% अमेरिकन डार्विनच्या उत्क्रांती सिद्धांतावर नव्हे, तर बायबलमधील मानवी जीवनाच्या उत्पत्तीवर विश्वास ठेवतात, ७७% लोकांना बायबलमध्ये वर्णन केलेले चमत्कार खरोखर घडले असे वाटते , ७६% ना देवदूत खरे असतात असे वाटते, मृत्यूनंतर कोणत्या तरी रूपात ते अस्तित्वात असतील अशी ६७% ची श्रद्धा आहे. फक्त १५% डार्विनचा सिद्धांत मानतात! ही 'पुढारलेल्या' अमेरिकेतील परिस्थिती. अशा श्रद्धा संदिग्ध लैंगिकता गर्ह्य मानतात यात नवल नाही. (आपल्याकडचे हे आकडे सहज ९०% च्या वर असावेत.) प्रामुख्याने पश्चिम युरप सोडता इतरत्र - आफ्रिका, आशिया, रशिया वगैरेत अशाच भूतकालीन श्रद्धा आहेत. मरणोत्तर अस्तित्वावरील विश्वास तर आज इस्लामी आतंकवादाला खतपाणी घालतो.

धार्मिक श्रद्धेतून विवाहसंस्थेचे उदात्तीकरण होते. तरी रूढ धर्म याला काही अपवाद करतो. उदा. हिंदू धर्माला आजन्म ब्रह्मचारी मान्य तर असतोच किंबहुना प्रसंगी आदरणीयही असतो. तीच गोष्ट catholic ख्रिश्चन धर्मगुरूंची. इस्लाममध्ये विवाह हे धर्मकर्तव्य दिसते. ब्रह्मचाऱ्याचा अपवाद सोडता हिंदू धर्म गृहस्थ आश्रम हा आयुष्यातला एक आश्रम मानतो. समाजाचा ओघ चालू ठेवण्यासाठी ते कर्तव्य ठरते म्हणजे होणारी संतती धर्ममान्य होते. संतती पूर्वजांचे ऋण फेडते ही श्रद्धा. त्यामुळे नि:संतान दांपत्यांकडे विशेषत: स्त्रियांकडे तुच्छतेने पहिले जाते. (अगदी सत्यनारायणाच्या कथेत लीलावतीला गर्भ न रहाणे हे 'वैगुण्य' पूजेने दूर झाले!). नि:संतान रहाणे ही एखाद्या स्त्रीची स्वत:ची निवड असू शकते हे बहुतांशी मान्य होत नाही. (नि:संतानांचा विचार पुढे केला आहे). तोच प्रकार आज संदिग्ध लैंगिकतेबद्दल.


**पूर्वग्रहांचा सामना**

वर म्हटल्याप्रमाणे एक तर संदिग्ध लैंगिकतेत विविधता असते. शिवाय अशा व्यक्तीच्या दृष्टीने तिच्यात काहीच उणे नसते. इतरांच्या दृष्टीनेही असू नये पण समाज ती व्यक्ती 'नॉर्मल' नाही असे मानतो. नुकताच आलेला भारतातील सुप्रिम कोर्टाचा 'खासगी' बाबींचा हक्क हे या दिशेने कायद्यातील महत्त्वाचे पाऊल वाटते. कायद्याचा अंमल चालवणारी यंत्रणा हा पुढचा प्रश्न कारण सामाजिक पूर्वग्रह हा या लोकांसाठी प्रमुख अडसर आहे.

इतरत्रचा विचार करता, तैवानने समलिंगी विवाह नुकताच कायदेशीर केला, अमेरिकेतील काही राज्यांत समलिंगी दाम्पत्यांना कायदेशीर संमती मिळावी अशी मागणी आहे - त्यांची दत्तक संतती, तिचे 'वारसा' हक्क, इत्यादी. तर चेचन्या या रशियातील राज्यात त्यांचा पद्धतशीर छळ होतो. आपल्याकडे करण जोहरने आपण समलिंगी असल्याचे जाहीर केले - अशा सेलेब्रिटी भूमिकेने सामाजिक मान्यतेचा उपक्रम पुढे जातो.

प्रामुख्याने युरपमध्ये LGBT या आद्याक्षरांनी प्रसिद्ध असलेली चळवळ गेली तीन दशके तरी सक्रिय आहे. Lesbian Gay Bisexual Transgender म्हणजे अनुक्रमे समलिंगी स्त्री, समलिंगी पुरुष, स्त्री-व-पुरुष दोघांशीही लैंगिक संबंध ठेवणाऱ्या आणि वरील अनेक प्रकारच्या संदिग्ध लैंगिक व्यक्ती.

या संदर्भात आयर्लंड देशाचा उल्लेख महत्त्वाचा. तेथील अलिकडच्या सार्वत्रिक निवडणुकीत लिओ वराडकर या भारतीय




किमान 'सगळे' मुसलमान, 'सगळे' कृष्णवर्णीय असे तरी म्हटले जात नाही. ही निरीक्षणे संदिग्ध लैंगिकता असणाऱ्यांना सकारात्मक लागू पडतील का, हे काळ ठरवेल.

**पुरुषी देहाच्या मर्यादा दृश्य स्वरूपात विस्तारणे**

संदिग्ध लैंगिकता नाही पण त्याला संलग्न एक छटा जपानमध्ये उदयाला आली आहे.

पुरुषाने कसे कपडे घालावेत, कसे दिसावे, मेक-अप करावा का याबाबत जपानी समाज व उर्वरित जग यांच्या दृष्टिकोनात फरक आढळतो. पश्चिमेत मिनी-स्कर्ट घालणारा, लीप-स्टिक लावणारा, चेहेऱ्याची रंग-रंगोटी करणारा, भुवया कोरणारा पुरुष संदिग्ध लैंगिकतेचे उदाहरण धरले जाईल.

वंशाच्या समलिंगी डॉक्टरची पंतप्रधानपदी निवड झाली. तेथे ख्रिश्चन धर्माच्या प्रभावाखाली आजही गर्भपाताला स्पष्ट मंजुरी नाही. वराडकरने गर्भपातावर पुढील वर्षी सार्वमत घेण्याची घोषणा केली आहे.

परत, वैद्यकीय व्यवसायावरील प्रचलित आदर्शवादाचा प्रभाव तेथील एका घटनेवरून स्पष्ट होतो. २०१२ साली १७ महिन्यांचा गर्भ आईला जीवघेणा ठरू शकेल हे दिसत असतानाही सविता हलप्पनवार या ३१ वर्षांच्या भारतीय दन्तवैद्याचा गर्भपात हॉस्पिटलने केला नाही. तीन दिवस यमयातना भोगून ती मरण पावली. धर्म-अंधश्रद्धा याचे हे विकसित देशातील उदाहरण. त्याविरुद्ध देशभर 'परत सविता नको' असे मोर्चे निघाले, चौकशी झाली, इत्यादी. या पार्श्वभूमीवर देशाचा पंतप्रधान समलिंगी पुरुष होतो, तोही स्थलांतरित झालेला दुसऱ्या पिढीचा मिश्रवंशीय. ही स्वागतार्ह घटना आहे.

अशा सामाजिक अंतर्विरोधाचा थोडाफार खुलासा समाजशास्त्रज्ञ करतात. लोकांचे पूर्वग्रह परिस्थितीनुसार बदलतात. उलट्या दिशेलाही जाऊ शकतात. उदा. दुसऱ्या महायुद्धात रशिया ब्रिटन, फ्रांसच्या बरोबर आणि जर्मनीच्या विरुद्ध होता. तेव्हा अमेरिकन लोकमत रशियनांना अनुकूल होते आणि जर्मनांना प्रतिकूल. नंतर साम्यवाद, शीत-युद्ध यामुळे जर्मन चांगले झाले आणि रशियन्स वाईट!

पूर्वग्रहाबाबत आणखी एक निरीक्षण आहे. जोपर्यंत 'समूह' असा शिक्का मारला जातो, तोपर्यंत लोकांचे पूर्वग्रह बळकट असतात. उदा. सध्या मुस्लीम. पण जेव्हा त्या समूहातील एखाद्याची वैयक्तिक माहिती होते, तेव्हा पूर्वग्रह पूर्णपणे बदलणे शक्य असते.

जपानमध्ये असा निष्कर्ष इतक्या घाईने प्रत्येक वेळी काढला जात नाही. फॅशन आणि लैंगिकता यांत फरक केला जातो. एखाद्या पुरुषाला स्त्रीसारखी वेषभूषा करावीशी वाटत असेल याचा अर्थ तो स्वत:ला स्त्री समजतो असा होतोच असे नाही. हा सूक्ष्म भाव आहे, त्याची ती संस्कृती दखल घेते. आपल्याकडे नाटकांत पुरुष स्त्रियांची भूमिका करत, तेव्हा त्यांच्या लैंगिकतेचा मुद्दाच अप्रस्तुत असे. तोच प्रकार आता नाटकाबाहेरच्या जपानी वास्तव जगात. प्रामुख्याने तरुण पिढीत जपानमध्ये हा कल आढळतो. त्यांना genderless danshi म्हणतात. danshi म्हणजे तरुण पुरुष. ते लैंगिकदृष्ट्या पुरुषच असतात. अभिव्यक्तीत पुरुषी देहाच्या मर्यादा विस्तारण्याच्या प्रयत्नात असतात असे म्हणता येईल. आजवर त्या समाजात स्त्रियांना पुरुषांचा हेवा वाटत असे कारण समाज पुरुषप्रधान आहे. अशी फॅशन करणारे पुरुष आज कदाचित स्त्रियांचा हेवा करतात कारण स्त्री आपण कसे दिसावे हे छोट्या छोट्या गोष्टीत स्वत: ठरवते - कपडे, चेहऱ्याचा मेक-अप, रंगीत लेन्सेस, केसांचा रंग, त्यांची रचना, इत्यादी. हे पुरुष तसे करतात. शिवाय जपानी समाजात 'यशस्वी' पुरुष पांढरा शर्ट, टाय, बूट घालणार, गडद रंगाचा सूट घालणार हे गृहीत आहे. त्या बंधनांचा हे 'स्त्री-स्वातंत्र्य' निषेध करते. हे danshi मोठ्या प्रमाणावर तरुण मुलींना प्रिय असतात. त्या हा 'नवीन' पुरुष मानतात.

**नि:संतान**

या संदर्भात नि:संतानांचा उल्लेख आवश्यक वाटतो. नि:संतान रहाणे हा स्वार्थी निवाडा असतो असे सध्याच्या (एरवी उदारमतवादी) पोपचे वक्तव्य. आणि पोप स्वत: ब्रह्मचारी! नि:संतान लोकांचा सामाजिक सहभाग संशयास्पद धरला जातो.

त्यांची समाजाच्या भविष्यात गुंतवणूक नाही, असा गर्भित आरोप. सध्याचे फ्रेंच राष्ट्राध्यक्ष, ब्रिटिश पंतप्रधान, जर्मनीच्या चॅन्सलर यांना मुले नसल्याने निवडणुकांदरम्यान या टीकेला सामोरे जावे लागले आहे. (आज यांच्याखेरीज जपानचा पंतप्रधान व इटलीचा पंतप्रधान हे नि:संतान आहेत. म्हणजे G7 या श्रीमंत राष्ट्रांच्या सात राष्ट्रांपैकी पाच राष्ट्रप्रमुख नि:संतान आहेत. त्याने त्यांच्या नेतृत्वक्षमतेवर अनिष्ट परिणाम झाल्याचे दिसत नाही.) विकसित देशांमध्ये सुमारे २० टक्के स्त्रिया व तितकेच पुरुष आज नि:संतान आहेत. याची अनेक कारणे असतात. अनेकांना योग्य व्यक्ती वेळात भेटत नाही, अनेकांची निराळी शारीरिक अवस्था असते, अनेकजण मुले नकोतच असा निर्णय घेतात, वीर्यातील शुक्रजंतूसंख्या खालावत आहे, वगैरे.

वस्तुत: हा गट सामाजिक योगदानात अग्रेसर असतो असे आढळून आले आहे. हे लोक मुले असणाऱ्या लोकांपेक्षा सेवाभावी कार्यांना जास्त मदत करतात, ते स्वत:ही अशा संस्था स्थापण्याची शक्यता जास्त असते. मूल नसलेल्या व्यक्ती व मूल असणाऱ्या व्यक्ती मरणोत्तर संपत्ती सेवाभावी संस्थेला कशी देतात हा अभ्यास अमेरिकेत झाला. त्यानुसार मूल नसलेली व्यक्ती पालकांपेक्षा १० हजार डॉलर्स जास्त दान करण्याची शक्यता असते कारण 'रक्ताचा वारसदार' नसतो. आनुवंशिक संपत्ती जगातील आर्थिक विषमता पुढच्या पिढीत मोठ्या प्रमाणावर चालू ठेवते. नि:संतान लोकांचा हा कल नसतो आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टीने ते कितीही अल्प प्रमाणात असले तरी महत्त्वाचे आहे.

राजकीय नेतृत्वाच्या संदर्भात पहाता ट्रम्प आपल्या स्थानाचा फायदा आपल्या मुलांना व जावयाला उघडपणे करून देतो व त्याला त्यात काही गैरही वाटत नाही. तोच प्रघात इंदिरा-संजय-राजीव गांधींपासून लालू-रबडी-तेजस्वीपर्यंत. अशी वशिलेबाजी व घराणेशाही मूल नसलेल्या नेत्यांच्या बाबत उद्‌भवत नाही आणि लोकशाहीची नीतिमत्ता बळकट होते.

**निरीक्षण**

संदिग्ध लैंगिक, नि:संतान हे उपेक्षित समूह आहेत. ते 'आत' आल्याखेरीज समाज संपूर्ण होत नाही.

उदा. भारतीय समाजाच्या विकासाची एक कसोटी 'जातीयवाद गेला का' ही असते. म्हणजे, 'बाहेरचे' 'आत' येतील. पण समाजाच्या प्रगतीचे ते केवळ एक गमक आहे. किंवा स्त्री-पुरुष समानता आली का, हेही केवळ एक गमक आहे. ग्रामीण-शहरी जीवनमानातील तफावत हे आणखी एक गमक आहे, वगैरे. कोणतेच एक गमक, त्याचे ते सर्वंकष नाही. असे निकष समाजाचे आरोग्य ठरवतात. काळानुसार, इतर समाजांशी होणाऱ्या संवादानुसार, नवीन मूल्यांच्या प्रभावाखाली, विज्ञानाच्या प्रगतीने, वगैरे ; असे अनेक निकष निर्माण होतात आणि होत रहाणारही. समाजाच्या उपेक्षित घटकांच्या दृष्टीने ते निकष लक्षात घेऊन श्रेयस्कर धोरणे आखणे हे समाजाचे कर्तव्य असले पाहिजे. त्यासाठी धोरण ठरवणारे आणि पाळणारे सतर्क आणि लवचिक असले पाहिजेत.

ही प्रक्रिया भारत किंवा अमेरिकेपेक्षा पश्चिम युरोपमध्ये जास्त गतीने व परिणामकारक होते असे माझे गेल्या वीस वर्षांच्या ब्रिटनमधील वास्तव्यातून व थोड्याफार प्रवासातून बनलेले वैयक्तिक मत आहे.

उदा. अपंग (किंवा आपल्या अलिकडच्या शब्दांत दिव्यांग) , एकट्या माता, अतिवृद्ध इत्यादींचे प्रश्न आहेत हे धोरणात्मकरीत्या युरपमध्ये मान्य झालेले आहे. ते प्रश्न सोडवणे ही एकूण समाजाची व मुख्यत: राज्याची - जबाबदारी आहे हे येथे सतत पुढे येते. किंवा आता नि:संतान असा काही लक्ष देण्यासारखा गट आहे, वगैरे. तसे भारतात होताना दिसत नाही. या मालिकेत आज तरी संदिग्ध लैंगिकतेची युरपमध्ये मुख्य प्रवाह दखल घेत आहे एवढे म्हणता येईल.

Richard Rorty या तत्त्वज्ञाच्या शब्दांत - मादी, कृष्णवर्णीय (आपल्याकडे 'खालची जात'), समलिंगी अशा संज्ञा निराधार आहेत. त्यांनी खुलाशापेक्षा समाजात गोंधळच जास्त घातला आहे. हाच न्याय संदिग्ध लैंगिकतेला लागू असावा. मागे एका लेखात म्हटल्याप्रमाणे आदर्श समाजात 'मुख्य प्रवाह' ही संकल्पनाच लोप पावावी.

भविष्याचा वेध घेण्याचे धाडस करता संदिग्ध लैंगिक, नि:संतान हा मानवी पुनरुत्पादन नियत करणारा उत्क्रांतीतील एक टप्पा दिसतो.

काही निवडक संदर्भ :

- The Blank Slate : The Modern Denial of Human Nature *Steven Pinker*

- Testosterone : Sex, Power and the Will to Win *Joseph Herbert*

- The New York Times International Edition, The Economist , इत्यादी नियतकालिकांचे अंक

- विविध वेब-साईटस्

*(सर्व चित्रे : चन्द्रशेखर पुरन्दरे)*

*चन्द्रशेखर पुरन्दरे, इंग्लंड*
*www.art-non-deco.com*
*art-non-deco@yahoo.co.uk*

❒